MIDC - DJMS
E&MD/ 15541
Date: 11/12/09

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

उद्योग सारथी
महाकाली गुंफा मार्ग,
मरोळ, अंधेरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०९३

क्र.मऔविम/विधी व कामकाज विभाग/ ९८ /२००९ दिनांक : - १०/१२/२००९.

## परिपत्रक

**विषय :- भुखड विकास मुदतवाढ मार्गदर्शक तत्वे अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :- १) परिपत्रक दिनांक ०२/०६/१९९८
२) परिपत्रक दिनांक १७/०८/२००४
३) परिपत्रक दिनांक २५/०८/२००८
४) परिपत्रक दिनांक ०९/०३/२००९

महामंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मुदतवाढ मार्गदर्शक तत्वानुसार भुखंड, शेड, गाळे यांना मुदतवाढी दिल्या जातात. प्रकरणी दि. ९/३/२००९ रोजी निर्गमित केलेले परिपत्रकानुसार तसेच दि. १७/८/२००४ च्या परिपत्रकानुसार ना परतीची अतिरिक्त अधिमुल्यांची रक्कम आकारुन मुदतवाढ द्यावयाची आहे. त्यानुसार प्रत्येक औद्योगिक क्षेत्रातील भुखंड विकसीत करण्यासाठी खालील प्रमाणे काल मर्यादा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | 'अ ' व 'ब ' विभाग | - | ३ वर्षे |
| २. | 'क' विभाग | - | ४ वर्षे |
| ३. | 'ड ' व 'ड+' विभाग | - | ५ वर्षे |

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, बहुसंख्य भूखंड हे बराच कालावधी लोटल्यांनतर देखिल विकसीत करण्यात आलेले नाहीत किंवा मुदतवाढ घेऊन देखिल विकसीत करत नाहीत अशा सर्व रिकाम्या भुखंडांचा आढावा घेवून प्रकरणीचा अहवाल १५ दिवसांत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात यावा.

तसेच असे जे उद्योजक विहीत मुदतीत भुखंडाचा विकास करण्यास असमर्थ (Defaulter) ठरले आहेत त्यांच्या विरुध्द भुखंड परत घेण्याच्या दृष्टीने महामंडळाने निश्चित केलेली कार्यप्रमाणाली अंवलंबून सदर भुखंड महामंडळाकडे परत घेण्याची कार्यवाही त्वरीत सुरु करावी व कार्यवाही पूर्तीचा अहवाल दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना न चुकता सादर करावा.

याची सर्व संबंधीतांनी नोंद घेवून काटेकोरपणे त्यांचे पालन करावे.

(डॉ. के. शिवाजी) 10/12/09
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत : माहितीसाठी सादर.
१. मा. अध्यक्ष, मऔविम, मुंबई.
२. मा. उपाध्यक्ष, मऔविम,मुंबई
३. मा. प्रधान सचिव(उद्योग) मंत्रालय, मुंबई.

प्रत :-
१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. सर्व कार्यालयीन प्रमुख, मऔविम
३. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
४. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम